जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/१०/२०२४
## दि.१७/१०/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २८४/२०२४ भा.न्या.सं.कलम ३११,११५(२),३५२,३५१(२) क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३४ वर्षे रा.दापोडी,पुणे. |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/१०/२०२४ रोजी ११/३० वा चे दरम्यान खडकी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे तोंड ओळखीचा नमुद इसम यांने नमुद ठिकाणी फिर्यादी यांना शिव्या देवून आमचे एरियामध्ये तुला भंगार गोळा करायचं असेल तर पैसे द्यावे लागतील असे बोलून चाकू काढून फिर्यादी यांचे पोटाला लावून शर्टाच्या खिशातील १५००/- रु रोख काढून घेवुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आण्णा गुंजाळ,मो.नं ९९७०७४६४५६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६६/२०२४ भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २३ वर्षे रा.हॅपी कॉलनी कोथरूड,पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/१०/२०२४ रोजी २१/३० ते दि.१६/१०/२०२४ रोजी २०/३० वा.चे दरम्यान प्रथमेश अपार्टमेंट,हॅपी कॉलनी कोथरूड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद ठिकाणाचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख १,५०,०००/-रू., ३०,०००/-रू कि.चे चांदीचे दागिणे व १५,०००/-रू कि.चे घड्याळ असे एकुण १,९५,०००/-रू.कि्चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.डोईफोडे मो.नं ७७९६५०४५४६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ४०७/२०२४ भा.न्या.सं.कलम ३३१(३),३०५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २९ वर्षे, रा.सिपला फाऊंडेशन रोड,वारजे,पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०२४ रोजी स. ०९/४५ वा. ते सायं.१८/४६ वा.चे दरम्यान पुजा हायलँड बिल्डींग,सिपला फाऊंडेशन रोड,व्हायला सोसायटी मागे वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद ठिकाणाचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले १,५५,०००/-रू किं चे सोन्याचे दागिने घरफोडी चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.नरळे मो.नं ०२०/२५२३७७७७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ९८०/२०२४,भा.न्या.सं.कलम १०६(१),२८१,१२५(अ),१२५(ब) मोवाका १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सिमंतिनी असेरकर ५४ रा.मोरे वस्ती रोड वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/२०२४ रोजी १६/०० वाघोली-लोहगाव रोड, डी मार्ट जवळ,वाघोली |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याने त्याचे ताब्यातील गाडी ही भरधाव वेगात निष्काळजीपणे, बेदरकारपणे चालुवन त्याचे गाडीवरील नियत्रंण सुटल्याने नमुद ठिकाणी गाड़ी रस्त्याचे कडेला चारीमध्ये पलटी होवुन फिर्यादीचा मुलगा अनुपम महेश असेरकर वय २८ वर्षे रा.सदर याचे तोंडाला, डोक्याला जबरी मार लागल्याने त्यांस गंभीर दुखापत होऊन तो उपाचारादरम्यान मयत झाल्याने त्यांचे मृत्यूस नमुद इसम कारणीभूत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.खटके मो.नं.९८२२०००९६२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १६९/२०२४,भा.नाया.सं.कलम १९४(२),२२१ |
| **फिर्यादी** | अमोल खारतोडे,पोलीस अंमलदार डेक्कन पोलीस स्टेशन पुणे, |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/१०/२०२४ रोजी १५/०० वा चे सुमा.अचानक मित्र मंडळाचे समोर,काळवाडा एरंडवणे,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांनी नमुद ठिकाणी आपआपसात झोंबाझोंबी करुन मारामारी व शिवीगाळ करुन पोलीसांच्या कायदेशीर कामामध्ये जाणीवपुर्वक अडथळा आणुन सार्वजनिक ठिकाणी दंगा करुन शांततेचा भंग केला. |
| **त.अंमलदार** | महिला पोलीस अमंलदार धनश्री सुपेकर मो.नं.९९२३३३५५१६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ११५३/२०२४,भा.न्या.सं.कलम ३५२,२२१,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | किरण झेंडे पोलिस अंमलदार शिवाजीनगर मुख्यालय,पुणे शहर. |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०२४ रोजी रात्री २०/१५ वा चे सुमा.शिवनेरीनगर गल्ली नं.२७, कोंढवा खुर्द, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे साथीदारांसह असे कोंढवा पोलीस स्टेशन, हद्दीतील शिवनेरीनगर परिसरात सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना नमुद ठिकाणी खुप गर्दी व ट्राफीक जाम झाल्याचे पाहून फिर्यादी हे साथीदारांसह गर्दी कमी करत असताना सदर गर्दीमध्ये नमुद इसम हातात लोंखडी हत्यार घेवून लोकांना शिवागाळ व दमदाटी करुन धमकावण्याचा प्रयत्न करीत असताना. फिर्यादी हे त्याच्या जवळ जात असताना नमुद इसमाचे पत्नीने फिर्यादीना पाहून नमुद इसमाचे हातातील कोयता अंधाराचा फायदा घेवून कोठेतरी लपवून आली असता नमुद इसम यांस पुढील कारवाई करीता कोंढवा पोलीस स्टेशन येथे घेवून येण्याचा प्रयत्न करीत असताना नमुद इसम याने व त्याच्या पत्नीने मोठ्या आवाजात फिर्यादीशी हुज्जत घालून, फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सचिन थोरात मो.नं.८६०५१९१४३६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**